


# गर्भपाताविषयी बोलू काही....




# गर्भपाताविषयी बोलू काही....

# तुम्हाला हे माहिती आहे का?

माता-मृत्यू ही भारतातील एक गंभीर समस्या आहे.
असुरक्षित गर्भपातांमूळे होणारे मृत्यू हे मातामृत्यूंचे एक प्रमुख कारण आहे.

२०१२ च्या आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी अंदाजे **५५०००** **माता-मृत्यू होतात**



एकूण मातामृत्यूंपैकी **८% मृत्यू** असुरक्षित गर्भपातांमुळे होतात

सुरक्षित गर्भपात सेवा मिळाली तर हे मृत्यू टाळता येतील.

**सुरक्षित प्रसूती सेवांप्रमाणेच सुरक्षित गर्भपात सेवा मिळणेही तितकेच गरजेचे आहे.**

# गर्भपात करून घेण्याची कारणे अनेकविध आहेत

- कुटुंब नियोजन
- पहिले मूल लहान असणे
- लग्न न झालेली मुलगी गरोदर रहाणे
- बलात्कारातून गर्भधारणा
- घटस्फोटीत किंवा एकटी स्त्री असणे
- मुलगाच हवा असा हट्ट



एका वर्षात ६४ लाख गर्भपात होतात त्यांपैकी **लिंगनिदान** करून होणाऱ्या **गर्भपातांचे प्रमाण** **९%** म्हणजेच अंदाजे ५ लाख ७० हजार इतके आहे.

म्हणजेच जवळपास ९१% गर्भपात हे इतर अनेक कारणांमुळे होतात.
यावरून गर्भपात सेवांची आवश्यकता लक्षात येते.

# सुरक्षित गर्भपात सेवांची आवश्यकता का?

भारतात एका वर्षात साधारणपणे
६४ लाख गर्भपात होतात.

**यापैकी निम्म्याहून अधिक
गर्भपात असुरक्षित पद्धतीने
होतात.**



असुरक्षित गर्भपात
५६%

कारण एकच –
सुरक्षित गर्भपात सेवांची
अपुरी पोहोच आणि
मर्यादित उपलब्धता!




सुरक्षित गर्भपात
४४%

सुरक्षित गर्भपात सेवांची माहिती प्रत्येक महिलेला असली पाहिजे
कारण गर्भपाताच्या सेवेची गरज कोणत्याही महिलेला लागू शकते.

# असुरक्षित गर्भपात म्हणजे काय?

असुरक्षित

घरगुती पद्धतीने, भोंदू डॉक्टरकडून किंवा गर्भपात कौशल्ये आणि परवानगी नसलेल्या डॉक्टरांकडून करवून घेतलेल्या गर्भपाताला ‘असुरक्षित गर्भपात’ म्हणतात.

पण कायद्याविषयी अज्ञान आणि अंमलबजावणीचा अभाव यामुळे सुरक्षित गर्भपातांचे प्रमाण चिंताजनकरित्या कमी आहे.

आपल्या देशात गर्भपाताचा कायदा अस्तित्वात आहे. यानुसार सरकारी मान्यताप्राप्त केंद्रात सुरक्षित गर्भपात सेवा मिळू शकते.

# असुरक्षित गर्भपात का होतात?

- गर्भपाताबद्दल उघडपणे बोलले जात नाही
- गर्भपात करणे म्हणजे 'पाप' किंवा 'हत्या' समजले जाते
- गर्भपात करणे हे बेकायदेशीर आहे असा गैरसमज असतो



- सरकारी दवाखान्यात गर्भपाताच्या सेवा मिळण्यात येणाऱ्या अडचणी
- खाजगी दवाखान्यात जास्त पैसे मागितले जातात
- लग्नाआधी गरोदर राहिल्यास बदनामीच्या भीतीने असुरक्षित गर्भपाताचा मार्ग अवलंबला जातो

असुरक्षित गर्भपात होण्याचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे गर्भपाताबद्दलचे गैरसमज व समाजाची मानसिकता.

# गर्भपाताचा कायदा काय सांगतो?

भारतात १९७१ मध्ये 'वैद्यकीय गर्भपाताचा कायदा' (एमटीपी ॲक्ट) अस्तित्वात आला. सध्या खालील पाच कारणांसाठी या कायद्याने गर्भपातास परवानगी आहे :

१. गर्भवती स्त्रीच्या जीवाला धोका असणे;
२. गर्भधारणेमुळे स्त्रीच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असणे;
३. गर्भामध्ये शारीरिक किंवा मानसिक विकलांगता असणे;
४. बलात्कारामुळे गर्भधारणा झालेली असणे;
५. विवाहित स्त्रीबाबत, गर्भनिरोधकांच्या अयशस्वीतेमुळे किंवा अयशस्वी वापरामुळे गर्भधारणा झालेली असणे.


सरकारी किंवा सरकारमान्य गर्भपात केंद्रांमध्येच कायदेशीर गर्भपात सेवा मिळू शकते.

बारा आठवड्यांपर्यंतच्या गर्भपाताला एका डॉक्टरच्या मताची,
तर १२ ते २० आठवड्यांपर्यंतच्या गर्भपाताला दोन डॉक्टरांच्या मताची आवश्यकता असते.

# मग लिंगनिदानाचे काय?



‘मुलगा हवा’ आणि ‘मुलगी नको’ या मानसिकतेतून अनेकजण स्त्रियांना लिंगनिदान करायला भाग पाडतात. ० ते ६ वर्षे वयोगटातील लिंगगुणोत्तरामध्ये असमतोल निर्माण होण्यामागे ही पुरुषप्रधान मानसिकता कारणीभूत आहे.



यासाठी भारतामध्ये ‘गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध कायदा आस्तित्वात आहे. यानुसार **लिंगनिदान करणे बेकायदेशीर आहे.** असे करणारी आणि करविणारी व्यक्ती ही शिक्षेस पात्र ठरते.

गर्भधारणेपूर्वी किंवा जन्माआधी गर्भाची लिंग निवड करण्यासाठी ज्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो, त्या सेवांचे नियमन या कायद्याअंतर्गत केले जाते.



हा कायदा लिंगनिदानावर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेला आहे. तो गर्भपाताला विरोध करत नाही किंवा गर्भपात सेवांवर नियंत्रण ठेवावे असेही सांगत नाही.

# या दोन कायद्यांमध्ये गल्लत का नको?

आपण हे लक्षात ठेवायला हवे की स्त्रियांना विविध कारणांमुळे गर्भपाताची गरज पडते.

एमटीपी कायद्यानुसार विशिष्ट कारणांसाठी

**वीस आठवड्यांपर्यंत**

गर्भपात सेवा वैध आहे.

पीसीपीएनडीटी कायद्यानुसार **गर्भलिंगनिदान करणे हा गुन्हा आहे.**

**गर्भपात हा गुन्हा नाही.**

त्यामुळे आपला विरोध हा गर्भलिंगनिदानाला हवा, गर्भपाताला नाही.

## गरजेप्रमाणे गर्भपाताच्या सेवा मिळाल्या पाहिजेत.

# आपली भूमिका काय असावी?

**स्त्रियांना गर्भलिंगनिदान करायला भाग पाडणे किंवा गरज असलेल्या स्त्रियांना गर्भपाताच्या सेवा न मिळणे या दोन्ही गोष्टी स्त्रियांच्या हिताच्या विरोधात आहेत**

- 'वैद्यकीय गर्भपाताचा कायदा' व पीसीपीएनडीटी यातील फरक समजून घेऊया व त्याविषयी इतरांना सांगूया.
- 'स्त्री-भ्रूणहत्या' या शब्दामुळे प्रत्येक गर्भपात म्हणजे 'हत्या करणे' असा गैरसमज स्थापित होत असल्याने 'स्त्री-भ्रूणहत्या' हा शब्द वापरणे पूर्णपणे बंद करावे.
- त्याऐवजी, ''आम्ही लिंगनिदानाला विरोध करतो'' असे स्पष्टपणे म्हणणे आवश्यक आहे.



**'स्त्रियांना सुरक्षित गर्भपात सेवांचा हक्क मिळाला पाहिजे' या मागणीसाठी एक होऊया.**

# गर्भपात सेवा किंवा गर्भनिरोधकांविषयी माहिती हवी आहे?

संपर्क करा

## १०७५ ७६४ ७६३

**मर्जी**

**हॉटलाईन**

सुरक्षित गर्भपात आणि गर्भनिरोधकांच्या माहितीसाठी

सोमवार ते शुक्रवार, सकाळी १० ते सायं. ६ पर्यंत

फोन करणाऱ्या स्त्री अथवा पुरुषाचे नाव व इतर माहिती गोपणीय ठेवली जाते.

प्रकाशक :

सम्यक

सम्यक - संवाद आणि संसाधन केंद्र

बी३/१४, दामोदर नगर, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे ४११०५१

फोन : +९१ ९४०३५१६२३७ ईमेल : samyak.pune@gmail.com

संदर्भ : **1. Guidance :** *Ensuring Access to Safe Abortion and Addressing Gender Baised Sex Selection, Ministry of Health & Family Welfare Government of India, February 2015)*

**2. Maternal Health :** *http://unicef.in/Whatwedo/1/Maternal-Health*

संकल्पना : आनंद पवार

संकलन : प्रितम पोतदार, सोनम धारफोडे, शिरीष वाघमारे

विशेष आभार : विद्या कुलकर्णी

डिझाईन, चित्रे : वृषाली जोशी

मुद्रण : संस्कृती डिझायनर्स ॲण्ड प्रिंटर्स, पुणे

सम्यक

प्रकाशक :

**सम्यक - संवाद आणि संसाधन केंद्र**
बी३/१४, दामोदर नगर, हिंगणे खुर्द,
सिंहगड रोड, पुणे ४११०५१
**फोन : +९१ ९४०३५१६२३७**
**ईमेल : samyak.pune@gmail.com**

अर्थसहाय्य :

SAAF Fondo de Acción para el Aborto Seguro
IPPF